# देवभूमीचे पक्षी वैभव

लेखिका: सौ. प्रतिभा गोरे | छायाचित्रे: दिलीप गोरे



# देवभूमीचे पक्षी वैभव

लेखिका: **सौ. प्रतिभा गोरे** | छायाचित्रे: **दिलीप गोरे**



# देवभूमीचे पक्षी वैभव

*Devbhumiche Pakshi Vaibhav*

© सर्व हक्क लेखिकेच्या स्वाधिन

**लेखिका** : सौ. प्रतिभा गोरे
९४०४२३४३४० (व्हॉट्स अप)

**छायाचित्रे** : दिलीप गोरे
२३५/ब/२, परेश अपार्टमेंट्स, पार्वती,
पुणे ४११००९
(मोबाईल : ९९२१७३६२०८)
(ईमेल : dilipdgore@gmail.com)

**मुखपृष्ठ व मांडणी** : पराग गोरे
बिझनेस मंत्रा
(होरायझन स्प्रेड मीडिया सर्व्हिसेस)
संपर्क - ९८९००४००१३
paragdgore@gmail.com

**प्रकाशक :**
ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com;
esahity@gmail.com


**प्रकाशनाची तारीख : २२ जून २०२०**

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2020. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## अर्पण पत्रिका

आम्हाला लिहिण्याची प्रेरणा देणाऱ्या आमच्या
पूज्य मातोश्री कै. ती. मालती दत्तात्रय गोरे यांस...



## मनोगत

'देवभूमीचे पक्षी वैभव' हे आमचे दुसरे ई बुक. उत्तराखंड मधील रुद्रप्रयाग जिल्ह्यात असलेल्या मक्कुमठ नावाच्या छोट्याशा पण निसर्गरम्य अशा खेड्यात राहून आजूबाजूचा निसर्ग, हिमालय व पक्षी यांचा अनुभव म्हणजे हे पुस्तक. हे पुस्तक कॉफी टेबल बुक या स्वरूपात करावे असे ठरवले व एका फोटो अल्बमच्या स्वरूपात हे सादर करत आहोत. प्रत्येक फोटो खाली समर्पक अशी ओळ सौ. प्रतिभाने लिहिलेली आहे. बाजूच्या रंगीत पट्टीवर त्या पक्षाचे काही वैशिष्ठ्य देण्याचा प्रयत्न केला आहे. आमचे पहिले पुस्तक 'पक्ष्यांचे नंदनवन - सिक्किम', या पुस्तकाला आपण जो प्रतिसाद दिलात, तो आम्हाला असेच काही करण्याची प्रेरणा देणारा ठरला. तसेच काही सुचना ही केल्या त्याबद्दल सर्व वाचकांचे आम्ही ऋणी आहोत. आमच्या या प्रयत्नाला सुद्धा आपण असाच प्रतिसाद द्याल अशी खात्री आहे.

पुस्तकाची संकल्पना सांगताच परागने अतिशय आकर्षक पद्धतीने पुस्तकाचे मुखपृष्ठ व आतील मांडणीचे काम पूर्ण केले तसेच अक्षय डिझाईन्सचे श्री. अक्षय कुलकर्णी यांची देखील खूप मदत झाली.

- सौ. प्रतिभा गोरे, दिलीप गोरे

# देवभूमीचे पक्षी वैभव

बद्रीनाथ, केदारनाथ, यमनोत्री, गंगोत्री ही चार धाम यात्रास्थळे. गंगा, यमुना यासारख्या नद्या, हिमालयासारखा नगाधिराज, पंच बद्री, पंच प्रयाग, पंच केदार या सारखी धार्मिक स्थळे व असंख्य हिंदू मंदिरे असलेली भूमी म्हणूनच ही देवभूमी. ह्या शिवाय पर्वतारोहण, रिव्हर राफ्टिंग, नेचर फोटोग्राफी, पक्षी निरीक्षण अशा प्रकारचे छंद असणाऱ्यांसाठी ही भूमी म्हणजे स्वर्गच. समुद्र सपाटीच्या आजूबाजूचा परिसर खूप वेळा पाहून झाला. आता हिमालय आणि अवती भवतीचा परिसर आणि निसर्ग सौन्दर्य तसेच पक्षी पहावे असे मनात आले. आमच्या सोबत माझा पुतण्या मिलिंद केळकर हा सुद्धा तयार झाला. इंटरनेट वरून माहिती मिळविली व मक्कुमठ ह्या जागी जाण्याचे ठरविले. तेथे श्री. यशपाल सिंग नेगीजी यांचा एक होमस्टे आहे व ते सर्व व्यवस्था करतात असे समजले. पुणे-दिल्ली-हरिद्वार असा रेल्वेने प्रवास केल्यावर, हरिद्वार येथून आम्ही मक्कुमठ येथे जाण्यास निघालो.

हरिद्वार येथून मक्कुमठ येथे जाण्यासाठी नेगीजींनी गाडीची व्यवस्था केली होती. हरिद्वार ते मक्कुमठ अंतर सुमारे २२५ किमी. आमच्या गाडीचा चालक बिपीन हा नेगीजींचा मुलगा असल्यामुळे आम्हाला काहीच अडचण नव्हती. मक्कुमठ, रुद्रप्रयाग जिल्ह्यातील एक छोटेसे परंतु निसर्गरम्य खेडे गाव. समुद्र सपाटीपासून उंची सुमारे ५३०० फूट. मार्कण्डेय ऋषींची तपोभूमी म्हणून हे प्रसिद्ध आहे. तसेच तुंगनाथचे हिवाळी वास्तव्याचे ठिकाण. मक्कुमठ, स्पॅरो हाऊस हा नेगीजींचा होम स्टे. रुद्रप्रयाग जिल्ह्यातील 'काक्रागड' येथे नेगीजींचा 'मॅगपाय बर्डिंग कॅम्प' होता. परंतु २०१३ साली मंदाकिनी नदीला आलेल्या पुरात हा कॅंप वाहून गेला व त्यामुळे नेगीजींनी मक्कुमठ येथे नवीन होमस्टे बांधला, तोच

'स्पॅरो हाऊस'. नेगीजींचा मुलगा गाडी चालक, नेगीजी बर्ड गाईड व सौ. नेगी सुगरण त्यामुळे सर्व सोयी एकाच छत्राखाली मिळतात. आम्ही साधारणतः रोज सकाळी ५.३० - ६.०० च्या दरम्यान बाहेर पडत असू. सकाळी वावर सुरु होण्यापूर्वी बरेच पक्षी रस्त्यावरच भेटत असत. गाडीची चाहूल लागताच झुडपात गायब व्हायचे. विशेषतः कलीज फेझन्ट याचे सहकुटुंब दर्शन रस्त्यावर हमखास ठरलेले. दिवसभर वेगवेगळ्या ठिकाणी पक्षी निरीक्षण करून संध्याकाळी परत मुक्कामी येत असू. नाष्टा, चहापाणी, जेवण हे वाटेतील धाब्यावर किंवा शक्य असेल तेव्हा होमस्टे वर होत असे.

नेगीजी अत्यन्त उमद्या स्वभावाचे गृहस्थ, पक्ष्यांचा चालता बोलता ग्रंथ. विविध प्रकारचे पक्षी दाखविण्यास कायम तयार. आम्ही सकाळी बाहेर पडल्यावर रस्त्याच्या दोन्ही बाजूला अत्यन्त बारकाईने नेगीजींचे लक्ष असायचे. योग्य ठिकाणी गाडी थांबवून आम्हाला पक्षी दाखवून फोटो काढल्यावर मग पुढील टप्पा. त्यांचा मुलगा बिपीन सुद्धा गाडी चालवत असला तरी त्याचेही बारकाईने पक्ष्यांवर लक्ष असे.

घराच्या आजूबाजूच्या रस्त्यांवर आम्ही सकाळ संध्याकाळ फिरत होतो. तिथल्या असीम डोंगर रांगा बघताना असे वाटायचे ह्या तर शिव शंकराच्या जणू जटाच, याच्याशिवाय दुसरी उपमाच नाही, किती म्हणजे किती असावेत डोंगर त्याला तर सीमाच नाही. आकाशातील पावसाळी ढगांना कसा आकार दिसतो तसा त्या डोंगरांना पण आकार दिसायचा. कधी वाटायचे हा हत्तींचा कळप विसावा तर घेत नाही ना. तर कुठे वाटायचे शंकर पार्वतीचे दोन चेहरे स्पष्ट ते देखील शंकर पार्वतीचेच नक्की अगदी नक्की. काही ठिकाणी वर निळेभोर आकाश खाली निळ्या डोंगर रांगा, त्या डोंगर रांगांच्या मधले अंतर स्पष्ट करणारे मध्ये पांढरे ढग, पहाटेची किरण गोठवणारी थंडी. पक्ष्यांचे आवाज हिरवंगार झाडांचे वैभव फळा फुलांची उधळण आणि पायाखाली रंगीबेरंगी चमकणारे मोहात पाडणारे दगड. छोट्या छोट्या दगडांच्या ही मोहात पडत होते मी. दुर्बिणीतून पक्षी बघून झाले की पायाखालचे दगड वेचत घरापर्यंत आणायचा रोजचा उपक्रम होता माझा. दगडातील क्वार्टज व मायका यांच्यामुळे हे दगड चमकतात.

आमची पहिली मक्कुमठ वारी मे मध्ये होती. त्यावेळी तेथील वातावरणात दिसणारे पक्षी वेगळेच होते. आम्हाला हिमालयन मोनाल हा पक्षी पहायचा होता. मक्कुमठ पासून

सुमारे २८ किमीवर चोप्ता गाव आहे. तेथून तुंगनाथ ट्रेकला जाण्याचा रस्ता आहे. तुंगनाथ समुद्र सपाटीपासून १२००० फूट उंचीवर आहे. तुंगनाथ देवळात जाण्याच्या रस्त्यावर सिमेंटचे बांधकाम केले आहे. त्यामुळे देवळापर्यंत पायी चढून अथवा  घोडयावर बसून जाता येते. तुंगनाथ सर्वात उंच शिव मंदिर, पंच केदार पैकी तृतीय केदार. येथून चंद्रशिला शिखर सुमारे २ किमी. आहे. नेगीजींच्या सांगण्यावरून आम्ही घोड्यावर बसून जाण्याचे ठरविले. नेगीजी, मिलिंद व आम्ही दोघे असे चौघे घोड्यावरून देवळात गेलो. तुंगनाथांचे दर्शन घेऊन आम्ही देवळाच्या मागे गेलो तो तेथील गवतात असलेल्या मोनाल पक्ष्याने आम्हाला दर्शन दिले. बरेच फोटो काढून झाल्यावर व मोनाल तेथून निघून गेल्यावर मगच आम्ही तेथून बाहेर पडलो. देवळाच्या परिसरातच (Crimson Browed Finch) लाल रंगाच्या चिमण्याही दिसल्या. तेथून पायीच खाली मुख्य रस्त्यावर आलो. त्याच रस्त्याने काही अंतर पुढे गेल्यावर रस्त्याच्या उतारावर पुन्हा एकदा मोनालचे दर्शन झाले. त्या शिवाय हिमालयन थार व पिका सुद्धा दिसले.

पिका, किंवा उच्चार पायका असाही करतात. ह्याचे वैशिष्ठ म्हणजे सशासारखे गोलाकार शरीर, आखूड पाय, शरीरावर एक प्रकारचे लोकरी आवरण, छोटे गोल कान. ह्या प्राण्याला शेपूट नसते. उंदरासारखा दिसणारा हा प्राणी हिमालयात १२००० फुटाच्या वरती आढळतो. उतारावरील खडकाळ भागात हा प्राणी गवत,  फुले व छोट्या वनस्पती खातो. आपल्या बिळात हिवाळ्यासाठी बेगमी केलेले गवत, झुडुपांच्या कोवळ्या फांद्या इत्यादींचा वापर अन्न म्हणून करतो. पिका एक प्रकारचा  शिट्टीसारखा आवाज काढतो म्हणून याला शिट्टी वाजवणारा ससा असेही म्हणतात. साधारणतः २६ डिग्री सें.पेक्षा जास्त तापमान ह्यांना सहन होत नाही. त्यामुळे जास्त उंचीवरच यांचा अधिवास असतो. हे साधारणतः ७ वर्षापर्यंत जगतात. हा प्राणी शीतनिद्रा (Hybernation) घेत नाही त्यामुळे उन्हाळ्यात हे अन्न साठविण्याचे काम करतात जे हिवाळ्यात उपयोगी पडते.

आमची दुसरी वारी जानेवारी महिन्यात होती. ह्या वेळी आमच्या बरोबर मिलिंद, मानसी व आदिती पण होते. चोप्त्याच्या मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला बर्फ पडलेले दिसत होते. तेथील वातावरणच निसर्गरम्य, किती फोटो काढू असे झाले होते. हिवाळ्यात घोड्याची सवारी नसते त्यामुळे वर जायचे असल्यास पायी जावे लागते. नेगीजी, मिलिंद व

आदिती हे तिघे पायी वर गेले, आम्ही मात्र तेथील रस्त्यावर पक्षी बघत फिरत होतो. चोप्ता, समुद्रसपाटीपासून सुमारे ८७९० फूट उंचीवर आहे. पाईन, देवदार व ऱ्होडोडेंड्रॉन ह्या वृक्षांची जंगले, तसेच अनेक कुरणे, दुर्मिळ पक्ष्यांच्या प्रजाती, कस्तुरी मृग, हिमालयन मोनाल सारखा पक्षी व पिका उंदीर चोप्ताच्या परिसरात पहायला मिळतात. चोप्ता, तुंगनाथ चंद्रशिला ट्रेक, ट्रेकर्स मध्ये फारच प्रसिद्ध आहे. चोप्ताला मिनी स्वित्झर्लण्ड असे म्हटले जाते.

एकदा एका धाब्यावर आम्ही जेवलो. गरम गरम रोटी व आलू की सब्जी असा बेत तेथे असतो. किचन पर्यंत कोणालाही जाता येत होते. बाहेर इतकी थंडी होती कि प्रत्येक जण चुलीच्या शेकोटीला आत पर्यंत जाई. थंडीमुळे सर्वांच्या पायात बूट मोजे असायचेच, काढणे शक्यच नव्हते. तसेच रोज अंघोळी नाहीच, या सर्व गोष्टी आपल्या पुणेरी चौकटी बाहेरच्याच. धाब्याच्या बाहेरच पाण्याचे नळ होते. जवळपासच्या डोंगरावरून पाईप लावून पाणी घरापर्यंत यायचे. एकदा गंमत झाली. आत शिरताना हात धुवून आत गेलो. चहा झाला. समोर नळ वाहताना दिसला, मी उठले नळ बंद केला. परत जेवायला टेबलापाशी. थोडा वेळ इकडे तिकडे गेला, परत नळ चालू. मी दोन तीनदा उठून बंद केला. शेजारी एक वयस्कर गृहस्थ बसले होते ते म्हणाले 'यहा के नल खुले ही रहते है। बंद करनेकी जरुरत नही है। खुला ही रहने दो। अर्थात हे सर्व, पाणी गोठून पाईप बंद होऊ नये म्हणून असते. आम्ही पुन्हा ७ - ८ महिन्यांनी आलो तेव्हा मात्र आम्ही कटाक्षाने नळ बंद न करता आत गेलो.

अक्षय्य तृतीयेपासून तेथील मुख्य रस्त्यावर चार धामच्या यात्रेसाठी आलेल्या गाड्यांची गर्दी होती. २०१३ मधील दुर्घटनेनंतर तेथील गर्दी नियंत्रित केली होती, त्यामुळे कित्येक यात्रेकरू वेळे अभावी दर्शन न करताच परतत होते. एके ठिकाणी नेगी, मिलिंद आणि दिलीप तिघे जण पक्षी बघायला पुढे गेले. नेगीजी मला म्हणाले, आप यही रुकीये हम लोग जल्दी आ जायेंगे। मला वाटलं जवळपास जाऊन येतील किंवा अवघड रस्ता असेल म्हणून मला थांबायला सांगितले. मी ही कुरकुर न करता तिथे थांबले. ती जागा म्हणजे एक रिकामे घर सर्व बाजूनी बंद होते. खाली वाहत्या पाण्याचा आवाज, झाडं झुडपं. पक्ष्यांची ये जा, दगड धोंड्यात मी रमले. मधूनच एखाद दुसरा माणूस पलीकडे जायचा. थोड्या वेळाने जरा भीती वाटायला लागली. अस्वस्थता वाढत होती. हे तिघे

पुढे गेले ते मागे येण्याचे नावच नाही. फोन लावते तर फोन लागेना. इतक्यात एक बाई तिचा छोटा मुलगा शाळेतून घराकडे चाललेले दिसले. तिला मागे बोलावले, आप आगे जा रही हो तो मेरा एक काम करोगी? धीर एकवटून तिला प्रश्न केला. मेरे साथ तीन आदमी लोग है। उनके पास कॅमेरे है। फोटो निकाल रहे है। ऊन को बोलना, मै यहा इंतजार कर रही हूँ। मैने बोल तो दिया लेकिन....... बापरे दुसरीच तीन माणसे आली तर? एक ना दोन, आधी थंडीने आणि मग भीतीने पुतळा झाला माझा. ती बाई म्हणाली, चलो मेरे साथ मै आपको पहूँचा देती हूँ। परत प्रश्न मी तिच्या बरोबर गेले, तिघे परत आले तर मी जागेवर नाही मग काय? हे तिघे भेटलेच नाहीत तर? तिच्या बरोबर किती लांब जायचे ? सगळेच अवघड. ती म्हणाली, घबराओ मत चलो मेरे साथ। नही नही मै नही आनेवाली। आप खाली उनको बता देना। ती खूपच आग्रह करायला लागली. आता आली पंचाईत, मीच तिला थांबवली होती. इतक्यात माणसांचा आवाज जवळपास आल्यासारखा वाटला. ती म्हणाली मेरा घर नजदिक है। आप मेरे घर चलो। चाय पानी पी लो, वो लोग आजाएंगे। मला आता काहीही सुचत नव्हते मग मी बोलायला सुरवात केली. आपको नेगीजी मालूम है। हा है। वो हमारे घर आते जाते है, वो पंछीके पीछे भागते फिरते है। माझा जीव एकदम भांड्यात पडला. हाँ हाँ वही नेगी साब, इतकं होई तो एक अवघड वळण आले. ती म्हणाली आप मेरा हात पकडो, धीरेसे चलो, तिचा मुलगा टणाटण उडया मारत निघून गेला आणि पलीकडे ह्या तिघांचा आवाज आला. ती बाई म्हणाली वो देखो यही है। ना आप के साथी। हा, हा चलो अच्छा, आंटी बाय बाय।

फोर्कटेल ह्या पक्ष्याचे दोन प्रकार येथे दिसतात. हे पक्षी पाण्याच्या छोट्या प्रवाहांजवळ आढळतात. एकदा अशाच छोट्या धबधब्याच्या जवळील पाण्याच्या स्रोताजवळ आम्ही वावरत होतो. तेथे आम्हाला स्पॉटेड फोर्कटेल दिसला. माझ्या चित्राच्या साच्यातला पक्षी. काळ्या रंगावर पांढरे ठिपके व लांब शेपूट. शाळेत असताना असे ठिपके दिल्याशिवाय माझे चित्र पूर्ण व्हायचेच नाही आणि फोर्कटेल सारखा डौलदार पक्षी माझ्यासमोर इकडे तिकडे दगडावर नाचत होता. अशी पाण्याची ठिकाणं पण माझ्या खूप आवडीच्या जागा. बूट काढून त्या पाण्यात मनसोक्त खेळते मी. आजकाल नवीन छन्दच लागलाय मला. वय विसरून क्षण साजरा करायचा आणि आनंदात डुंबायचं. अशा रस्त्यांवर गाईड आणि दिलीप

यांच्या शिवाय कोणी नसतेच. दिलीप कॅमेऱ्यात रमतो नी मी माझ्या विश्वात. निसर्गातून जे शोषून घेता येईल ते शोषून घेत जायचे. या ठिकाणी एकाच प्रकारच्या फुलपाखरांची गर्दी दिसली. इतक्या संख्येनी ही फुलपाखरं मी प्रथमच बघत होते. नेमका त्यांचा कसला उत्सव होता कळले नाही. तिथल्या तिथे  भिरभिरण्यात मग्न होती. त्याच विचारात मी पायातले बूट काढले आणि पाण्यात खेळत राहिले. चालून चालून, उभे राहून थकलेल्या पायांना पाण्याचा थंडगार स्पर्श सुखावत होता. नितळ स्वच्छ पाण्यातले वाहून आलेले दगड व उखडलेल्या रस्त्याची खडी माझ्या पायांना अक्युप्रेशर मसाज करत होती. निरनिराळ्या विचारांची ये जा माझ्या मनात अखंड चालू होती तशी दिलीपच्या कॅमेऱ्यात पक्ष्यांची ये जा चालू होती. एखादा विचार रुजावा तसा पक्षी कॅमेऱ्यात रुजायचा म्हणजे क्लिक व्हायचा. पण अशा पाण्याच्या ठिकाणी आता मी सावध राहते. या पाण्यात एकदा मला काही तरी चावले, ते सहा महिने पुढे पुरले, त्यामुळे पाण्याची हौस थोडक्यात भागवायची. तेव्हा जंगलातला वावर, सावधानतेचा धडा मला बऱ्याच वेळा देत असतो तेव्हा तुम्हीही सावध असा.

दोन्ही वेळा मिळून आम्ही मक्कुमठ येथे सुमारे १३ दिवस राहिलो. ह्या तेरा दिवसात आम्ही पक्ष्यांच्या सुमारे ९५ प्रजाती पाहिल्या. त्या शिवाय तुंगनाथांचे दर्शन, उखीमठ येथील केदारनाथचे दर्शन, चोप्ता, हिमालयन मोनाल ह्या सर्व गोष्टींचा विचार केल्यास आमची ही हिमालय परिसरातील ट्रिप पक्ष्यांच्या दृष्टीने अत्यन्त अविस्मरणीय अशी झाली आणि हिमालय व तेथील पक्षी आम्हाला खुणावत राहिले.

■■■



लक्ष्मण झुला, ऋषीकेश

त्र्यम्बकेश्वराचे, मंदिर केशरी। झुलाही केशरी, वाहणारा।

मक्कुमठ येथे जाताना ऋषीकेश येथूनच जावे लागते. ऋषीकेश मध्ये अनेक आश्रम, देवळे आहेत. तसेच संध्याकाळी गंगेच्या आरतीसाठी गंगा तीरावर भाविकांची प्रचंड गर्दी असते. हा प्रसिद्ध लक्ष्मुमण झुला. डाव्या हाताला समोर १३ मजली भव्य त्र्यम्बकेश्वर मंदिर.



गंगेच्या तीरावरील त्र्यम्बकेश्वर मंदिर

निर्मळ गंगेचे, घेऊन दर्शन। तृप्त होते मन, प्रत्येकाचे।



गंगा भारतीयांसाठी श्रद्धेचे स्थान. मक्कुमठ येथे जाताना रुद्रप्रयाग पर्यंत गंगा नदी आपल्या सोबतच असते. ऋषिकेश येथील गंगा नदी व त्यासमोरील भव्य त्र्यम्बकेश्वर मंदिर ह्या समोर उभे राहिले कि एक वेगळीच अनुभूती मिळते.



अलकनंदा व भागीरथी संगम

अलकनंदा नी, भागीरथी दोघी। म्हणे सरस्वती, गुप्त आहे।

देवभूमीचे पक्षी वैभव

देवप्रयाग ऋषीकेश पासून सुमारे ७५ किमी. येथे अलकनंदा व भागीरथी या दोन नद्यांचा संगम आहे. येथे सरस्वती नदी गुप्त रूपात आहे. ह्या संयुक्त प्रवाहाला पुढे गंगा असे म्हणतात. येथील रघुनाथजी मंदिर प्रसिद्ध आहे. त्या शिवाय आचार्य कै. पंडित चक्रधर जोशी (प्रसिद्ध ज्योतिष शास्त्री व खगोलशास्त्रज्ञ) यांनी १९४६ साली स्थापन केलेली नक्षत्र वेधशाळा आहे. देवप्रयाग येथे हि वेधशाळा दशरथांचल पर्वतावर आहे. तेथे दोन दुर्बिणी व अनेक संदर्भग्रन्थ व जुनी हस्तलिखिते आहेत.



स्पॅरो हाऊस

पिता पुत्र दोघे, सुग्रण गृहिणी। सोयही करती, राहण्याची।

देवभूमीचे पक्षी वैभव

स्पॅरो हाऊस मध्ये डावीकडून बिपीन (नेगीजींचा मुलगा), मिलिंद केळकर, श्री. व सौ. नेगी, सौ. प्रतिभा गोरे व आदिती केळकर.

नेगीजी, अत्यन्त दिलदार गृहस्थ, त्यांचे पक्ष्यांबद्दलचे ज्ञान अफाट आहे. केव्हाही एखादा पक्षी दिसला कि त्वरित त्याची माहिती हजर. रोज सकाळी ५. ३० वाजता आमच्याबरोबर जायला तयार. पक्षी निरीक्षणात जो संयम लागतो तो वाखाणण्यासारखा.



ग्रे विंग्ड ब्लॅकबर्ड - मेल (Grey Winged Blackbird - Male)

रसाळ मधुर, अधांतरी फळ। खाण्यातही खेळ, चाले याचा।

देवभूमीचे पक्षी वैभव

थ्रश फॅमिलीतील हे पक्षी हिमालयात आढळतात. नराला काळ्या रंगावर ग्रे पंख, नारिंगी चोच व डोळ्याभोवती असलेली रिंग ही वैशिष्ट्ये. जंगलात कमी उंचीच्या झाडांवर आढळतो.



ग्रे विंग्ड ब्लॅकबर्ड - फिमेल (Grey Winged Blackbird - Female)

गांडूळ चोचीत, नजर नभात। विचार मनात, काय चाले?

देवभूमीचे पक्षी वैभव

फिमेल ब्राउन रंगाच्या असतात. किडे, अळ्या तसेच काही प्रकारची फळे हे पक्षी खातात. जमिनीपासून साधारणत: १० - २० फूट उंचीवर घरटे बांधतात.



प्लेन बॅक्ड थ्रश (Plain Backed Thrush)

हीच आहे माझी, नित्याची बैठक। काही ना बाधक, आहे येथे।

देवभूमीचे पक्षी वैभव

प्लेन बॅक्ड थ्रश हे थ्रशच्या तीन प्रजातींना मिळून दिलेले नाव. त्या प्रजाती म्हणजे अल्पाइन थ्रश, सिचुआन थ्रश व हिमालयन थ्रश. हा पक्षी उन्हाळ्यात दगडांवर किंवा गवताळ उतारांवर दिसतो. हिवाळ्यात जंगलात दिसतो.



चेस्टनट क्राऊन्ड लाफिंग थ्रश (Chestnut Crowned Laughing Thrush)

एकरूप दोघे, निसर्गाशी होती। तयाची प्रचिती, आली येथे।

हा पक्षी साधारणतः गावातील कचरा टाकलेल्या जागी सुद्धा दिसतो. गंगटोक मध्ये सुद्धा आम्ही हा पक्षी पाहिला आहे. छोट्या छोट्या गटांमध्ये हे पक्षी जमिनीवर आपले भक्ष शोधतात.



स्ट्रिक्ड लाफिंग थ्रश (Streaked Laughing Thrush)

विसाव्याचा  क्षण, संपता सत्वर।  बळ पंखावर, क्षणार्धात।

हा पक्षी नेगीजींच्या घरापाशी दिसत होता. साधारणतः घरातील खरकटे टाकलेल्या जागी दिसतो. ह्या पक्ष्यांचे छोटे गट झुडूपात लपून आपले भक्ष शोधत फिरतात.



रुफस चीन्ड लाफिंग थ्रश (Rufous Chinned Laughing Thrush)

जळातील रंग, अंगावर नक्षी। सजवून पक्षी, पाठविला।

जोडीने किंवा छोट्या गटात आढळतो. कायम झुडूपाच्या आत लपतो.जमिनीपासून ५-१५ फूट अंतरावर छोट्या झाडावर किंवा झुडूपात V आकाराच्या फांदीत घरटे बनवतो. भारतातील वेगवेगळ्या ठिकाणी दिसणाऱ्या ह्या पक्ष्याच्या रंगामध्ये थोडाफार फरक आढळतो.



स्केली थ्रश (Scaly Thrush)

पोटातील भूक, चतुरता देते। खाद्य हाती येते, सहजच।

देवभूमीचे पक्षी वैभव

वरील बहुतेक थ्रश मानवी वस्तीजवळ तसेच जंगलात सुद्धा दिसतात. साळुंकीच्या जवळपास आकार असलेले हे पक्षी अळ्या, छोटे किडे तसेच काही प्रकारची फळे खातात. आपले अन्न जमिनीवरच शोधतात.



स्ट्राएटेड लाफिंग थ्रश (Striated Laughing Thrush)

रंग पाचोळ्याचा, शुभ्रशा रेषांचा। फुलोरा पिसांचा, डोईवर।

इतर लाफिंग थ्रश च्या मानाने हा थ्रश जास्त करून झाडावर दिसतो. क्षणात चोच खाली घेण्याची व आपल्या तुऱ्याला झटका देण्याची याची पद्धत ह्याचे वैशिष्ठ दाखविते.



हिमालयन बुलबुल (Himalayan Bulbul)

अरे चित्रकारा, रंग संगतीचा। खेळ खेळायाचा, शिकलो मी।

हिमालयन बुलबुल किंवा पांढऱ्या गालाचा बुलबुल असेही म्हणतात. जंगलं, गावातील बगीचे इत्यादी ठिकाणी हा दिसतो. याचा सर्वत्र जोडीने वावर असतो. छोटी फळे , फुलातील रस, लहान सरपटणारे प्राणी, कीटक हा याचा आहार. कमी उंचीच्या फांद्यावर यांची घरटी असतात. पिले वाढविण्याच्या काळात मोठे पक्षी आपल्या क्षेत्राबद्दल खूपच आक्रमक असतात.



ब्लॅक बुलबुल (Black Bulbul)

बुलबुल आहे, काळा नी पांढरा। चोच पाय त्याला, शोभणारे।

शक्यतो गटा गटानी दिसतात, अत्यन्त गोंगाट करताना आढळतात. छोटी फळे, फुलातील रस व छोटे किडे हे यांचे खाद्य. पंख असलेले कीटक पकडण्यासाठी बऱ्याच वेळी हवेत गिरक्या मारतात. ऱ्होडोडेंड्रॉनच्या फुलांवर रस खाण्यासाठी हमखास येतात व तेथे येणाऱ्या इतर पक्ष्यांना हुसकावून लावतात.



रॉक बंटिंग (Rock Bunting)

निळ्या चौकटीत, करताना क्लिक| होते माझे लक्ष, दिलीप जी|

देवभूमीचे पक्षी वैभव

पिसांच्या रंगावरून ह्याच्या ४ उपजाती आहेत. घरटी जमिनीवर किंवा झुडुपांच्या अगदी खालील फांद्यावर असतात. एका वेळी ३-५ करड्या रंगाची अंडी घालतात. पिलांचे संगोपन चांगले व्हावे म्हणून त्या वेळी जमीनीवरील कीटक सुद्धा उचलतात व इतर वेळी बिया खातात.



चौखंबा पीक (Choukhamba Peak)

निळाई नभाची, "चौखम्बा" शुभ्रसा। वाटे पहावासा, पुनः पुन्हा।

चौखम्बा शिखरांचा समूह आहे, गंगोत्री  ग्रुप ऑफ माउंटन्स, ह्या चार शिखरांची उंची सुमारे ७१५० मीटर ते ६९०० मीटर पर्यंत आहे. तुंगनाथ मंदिरापासून चंद्रशिला शिखर ट्रेक आहे. तेथून नंदादेवी, त्रिशूल, केदार शिखर व चौखम्बा शिखरांचा समूह दिसतो.



मरून ओरिओल (Maroon Oriole)

लाल लाल मिर्ची, खातोस कशाला। कायम बुडाला, रंग आला।

देवभूमीचे पक्षी वैभव

काळा व मरून रंग. छोटी फळं, फुलातील रस, छोटे किडे हे ह्यांचे खाद्य. पिलांचे संगोपन नर,मादी दोघेही मिळून करतात. मरून रंगाचा व बुडाला लाल रंग असलेला हा पक्षी कुठूनही सहज लक्षात येतो.



अल्ट्रा मरीन फ्लाय कॅचर (Ultra Marine Flycatcher)

गुलाबी हिरवी, शोभा पाठीमागे। फांदीवर शोभे, निळा किती।

हिमालयात वेगवेगळ्या ठिकाणी आढळणाऱ्या या पक्ष्याच्या रंगात थोडा फरक आढळतो. कमी उंचीवर असलेल्या फांद्या, झुडुपे ह्यावर सहसा एकटा दिसतो. हिवाळ्यामध्ये पुण्यातील सिंहगड व्हॅली मध्येही आढळतो. मुख्यतः कीटक हे ह्याचे खाद्य.



ग्रीन टेल्ड सनबर्ड (Green Tailed Sunbird)

फोटोसाठी जागा, फांदीवर आहे। प्रभावळ मागे, शोभणारी।

लांब पुढे वाकलेली निमुळती चोच. फुलातील रस हे मुख्य अन्न परंतु पिलांचे संगोपन करताना कीटक व छोटे कोळी हे सुद्धा त्यांचे खाद्य . त्यांचे पंख छोटे असल्यामुळे जलद व थेट उड्डाण. अत्यन्त चपळ व सहसा जोडीने दिसणारे. आकाराने लांब, लाल किंवा भगव्या रंगाची फुले ह्यावर आढळतात. घरटी पर्सच्या आकाराची असतात व फांदीवर लोम्बकळतात.



व्हाईट थ्रोटेड लाफिंग थ्रश (White Throated Laughing Thrush)

पानांवर उभा, उठून दिसतो। नजर रोखतो, कोणावर?

सहसा ८-१० पक्ष्यांचा छोटा गट आढळतो. जमिनीवर उड्या मारत जमीन उकरत जमिनीतील किडे शोधतात. मोठा गोंगाट करत हे पक्षी खाली उतरतात. साधरणतः १० फूट उंचीपर्यंत कपाच्या आकाराचे घरटे झाडावर तयार करतात. निळ्या रंगाची ३-४ अंडी घालतात.




येलो ब्रेस्टेड ग्रीन फिंच (Yellow Breasted Green Finch)

तुझ्या रंगसंगतीचा, मला मोह झाला। जसा फांदीला या, तुझा भार झाला।

५००० - ९००० फूट उंचीवर आढळतात. उन्हाळ्यात मात्र त्यापेक्षा जास्त उंचीवर आढळतात. मोठे गट करून उडतात. क्षणात एखादा थवा जमिनीवर येतो व क्षणात आकाशात झेपावतो. झाडाच्या रिकाम्या फांद्यांवर थवा उतरतो. बिया व किडे हे त्यांचे भक्ष.



स्कार्लेट फिंच (Scarlet Finch)

पुन्हा भेट केव्हा, कधी ती कळेना। पुन्हा भेट नाही, मना साहवेना।

देवभूमीचे पक्षी वैभव

दाट जंगलांमध्ये आढळतात. छोटे, मोठे गट करून झाडांच्या शेंड्यांवर किंवा मोकळ्या फांद्यांवर दिसतात. विविध प्रकारची फळे व बिया हे त्यांचे खाद्य. ह्या शिवाय झाडांच्या फांद्यांच्या खाली असलेल्या शेवाळामध्ये असलेले कीटक हि खातात.



ब्लू कॅप्ड रॉक थ्रश (Blue Capped Rock Thrush)

चोचीतली गोम कळली मला रे। दृष्टीतली गोम कळेना मुळीरे।

झाडांच्या खोडांवरील कीटक हा यांच्या अन्नाचा एक भाग. काही वेळा झाडांवरून जमिनीवर येऊन किडे उचलून घेऊन जातात. हा पक्षी उडताना ह्याच्या पंखावरील पांढरा पॅच दिसतो. हे पक्षी विणीच्या हंगामात हिमालयाच्या पायथ्याशी आढळतात व हिवाळ्यात दक्षिणेकडील पर्वत रांगात दिसतात. हा पक्षी कर्नाटकातील दांडेली येथेही आम्ही पाहिला होता.



**कोक्लास फेझन्ट** (Koklass Pheasant)

हिरव्या पानात, उठून दिसतो। रोखून पाहतो, कोणाकडे।



झुडूपात राहून जमिनीवर आपले अन्न शोधतात. वर्षातील बराच काळ हे पक्षी शाकाहारी असतात, त्या काळात हे पाईनची फळे, पाईन व बांबूचे कोंब तसेच बिया खातात. घरटी बांधणे, पिले वाढविणे ह्या काळात ते कीटक, मुंग्या सुद्धा खातात. ते जमिनीवर घरटी बांधतात परंतु रात्री झाडावर असतात.



यूरेशिअन जय (Eurasian Jay)

नावडे का तुज, निसर्गाची शाळा। नजर तुझी का, हरवली बाळा।

अनेक पक्ष्यांच्या आवाजाची नक्कल हा पक्षी करतो. अळ्या, किडे तसेच ओक ह्या झाडाच्या बियाही खातो. तसेच त्याचा हिवाळ्यासाठी साठाही करून ठेवतो. आपले पंख परजीवी कीटकांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी हा पक्षी मुंग्याच्या वारुळावर पंख पसरून बसतो. मुंग्यांनी उडवलेल्या फॉर्मिक ॲसिड मुळे त्यांचे पंख स्वच्छ रहातात.



ब्लॅक हेडेड जय (Black Headed Jay)

हिरवी पिवळी, झाडावर नक्षी। विसावला पक्षी, झाडावर।

हा पक्षी झाडांवर तसेच जमिनीवर दिसतो. अळया, किडे इतर पक्ष्यांची अंडीही खातो. तसेच गावातील वस्तीजवळ खरकटे सुद्धा खाताना आढळतो. झाडे व झुडुपांवर घरटी करतो. पिलांचे संगोपन नर व मादी दोघे मिळून करतात.



ब्लॅक फेस्ड वारब्लर (Black Faced Warbler)

डोळे रोखलेले, मान वळलेली। फोटोसाठी स्वारी, सज्ज आहे।

लहान, आवाज करणारे व कीटक भक्षी. ह्यांच्या पिसाऱ्यात सहसा करड्या व चॉकलेटी रंगाच्या छटा. वरच्या बाजूला गडद व खालच्या बाजूला अस्पष्ट रंग. शेपूट चौकोनी अथवा गोलाकार. बहुतेक प्रजाती कीटक भक्षी आहेत. परंतु काही छोटी फळे सुद्धा खाणाऱ्या प्रजाती आहेत.



कोल टिट (Coal Tit)

रंग संगतीचा, उत्कृष्ट नमुना। पक्षीही देखणा, आवडला।

देवभूमीचे पक्षी वैभव

हे पक्षी इतर टिट सह थव्याने आपले अन्न शोधायला इकडून तिकडे उडत असतात. इतर टिट प्रमाणे हे पण क्षणात एखाद्या झाडावर बसतात काही क्षणात उडून जातात. बीच ची फळे, फर व लार्च कोन मधील बी खातात. वाळलेल्या झाडाच्या खोडातील छिद्रे, उंदीर, ससा यांची बिळे ह्या त्यांच्या घरट्याच्या जागा असतात.



ब्लॅक थ्रोटेड टिट (Black Throated Tit)

तुझ्या फांदीला या, काटे किती रे। तुला भय त्याचे, आहे कुठे रे।

देवभूमीचे पक्षी वैभव

मोठ्या पानांच्या वृक्षांचे जंगल तसेच पाईन वृक्षांच्या जंगलात सहसा आढळतात. सुमारे ३०-४० पक्ष्यांचा थवा एका वेळी वावरताना दिसतो. झाडांवर लोम्बणारे शेवाळ व लीचेन यांच्यापासून घरटी बनवितात.छोटे कीटक,कोळी तसेच बिया फळे हा ह्यांचा आहार.



ग्रेट बार्बेट (Great Barbet)

निवांत क्षणांना, पंख विसावले। पाय थबकले, फांदीवर।

उंच झाडांच्या शेंड्यावर शक्यतो बसतात,अंगावरील हिरव्या पिवळ्या रंगामुळे व हिरव्या पानात दडून बसल्यामुळे संरक्षण मिळते. फळे खातात शिवाय काही कीटक हा यांचा आहार. जमिनीपासून साधरणतः ३० फुटापर्यंत उंचीवर झाडाच्या खोडामध्ये आपली घरटी बनवतात.



व्हाईट ब्रोड फुलवेट्टा (White - Browed Fulvetta)

नभात कोवळे, पंख पसरण्या। उत्सुक पाहुणा, झेपावेल।

सुमारे ७००० -१२००० फूट उंचीवर आढळतात. गटा गटाने अत्यन्त चपळाईने उडताना आढळतात. सहसा छोटी झुडुपे वा छोटी झाडे यावर वावरतात. छोट्या फांद्यावर उलटे लटकून आपले अन्न मिळवतात. छोट्या बिया व कीटक हे त्यांचे अन्न.




अल्पाईन असेन्टर (Alpine Accentor)

मजबुत आहे, पायाची पकड। उताराचे भय, मला नाही।



एकटा किंवा छोट्या गटामध्ये जमिनीवर चिमणीप्रमाणे उडया मारत हे पक्षी जमिनीवरील किडे किंवा बिया टिपतात. दगडाखालील फटींमध्ये शेवाळ व गवतापासून बनवलेले कपासारखे घरटे असते.



हिमालयन थार (Himalayan Thar)

पिलासवे आली, मोकळ्या हवेत। निवांत फिरत, होती दोघे।

देवभूमीचे पक्षी वैभव

खडकाळ प्रदेशातील उतारावर, २५०० - ५००० मीटर उंचीवर हे आढळतात. स्नो लेपर्डसचे भक्ष हा प्राणी सहज होतो. ह्यांचे अंदाजे १४ -१५ वर्षांचे आयुष्य असते. नराचे वजन ७३ किलो व मादीचे वजन ३६ किलो असते. नराची शिंगे मागे वळलेली असतात.



**हिमालयन थार** (Himalayan Thar)

कशी अचानक, चुकामुक झाली। शोधत राहिली, सभोवार।

हिमालयात आढळणारा बकरीसारखा प्राणी. ह्यांच्या अंगावर कमी तापमान सहन करू शकतील असे जाड , तांबडे लोकरी कोट. हिवाळा संपल्यावर वरील कोटाचा रंग कमी कमी होत जातो. त्यांच्या पायाची व खुरांची रचना अशी असते कि पर्वतातील मऊ व खडबडीत पृष्ठभागावर पायांची पकड चांगली रहाते. हे प्राणी वनस्पतींची पाने, गवत खातात. ह्यांच्या पोटाची रचना अशी असते कि त्यांना रवंथ करणे शक्य होते.




निसर्गरम्य चोप्ता (Road to Chopta)

बर्फावर ऊन, उतरे कोवळे। उन्हाचे नजारे, शोभिवंत।



चोप्ता ला उत्तराखंड चे मिनी स्विट्झरलंड असे म्हणतात. येथून तुंगनाथ, देवरीया ताल,चंद्रशिला ट्रेकची सुरवात करता येते. ही भूमी येथील वृक्ष व पक्षी यांची विविधता, गवताळ प्रदेश, अत्री मुनी फॉल्स, येथून दिसणारी हिमालयातील ४१ विविध शिखरे, रस्त्यावर दिसणारे ओक, पाईन व ऱ्होडोडेंड्रॉन वृक्ष असल्या वैभवाने समृद्ध आहे.



चोप्ताच्या परिसरात (Surrounding Chopta)

निळाई नभाची, निळेच डोंगर। मधले अंतर, धुक्याचेच।



चोप्ता,उत्तराखंड मधील एक निसर्गरम्य ठिकाण. तुंगनाथ ट्रेक साठी येथूनच सुरुवात केली जाते. तुंगनाथ, पंच केदार पैकी तृतीय केदार. चोप्ता जवळील जंगल पाईन, ऱ्होडोडेंड्रॉन व देवदार ह्या वृक्षांनी भरलेले असल्यामुळे तेथे पक्ष्यांच्या अनेक प्रजाती आढळतात.



**हिमालयन मोनाल (मेल)** (Himalayan Monal - Male)

**चमकते अंग, मोनाल पक्ष्याचे। भय त्या उन्हाचे, सदोदित।**

उत्तराखंड राज्याचा राज्य पक्षी. चकाकणारे इंद्रधनुषी रंग, डोक्यावर तुरा असा हा पक्षी साधारण ९००० फुटापेक्षा जास्त उंचीवर तसेच ऱ्होडोडेंड्रॉन व बांबु सारख्या वनस्पती असलेल्या ठिकाणी आढळतो. उन्हे पडल्यावर मात्र हे चकाकणारे रंग शिकारी पक्ष्यांना सहज दिसतात त्यामुळे स्वसंरक्षणार्थ हे पक्षी सावलीत वावरतात.



हिमालयन मोनाल (फिमेल) (Himalayan Monal - Female)

**मोनाल पक्ष्याची, मोनाल पक्षिणी। वावर अंगणी, करणारी।**

ब्राउन रंग, डोळ्याभोवती निळा रंग, मान व शेपटीवरील पांढरी पट्टी हि फिमेलची वैशिष्टे. हिवाळ्यात अत्यन्त कमी तापमान सहन करतात व बर्फामध्ये खोदून किडे व झाडांची मुळे हे आपले अन्न मिळवतात. एप्रिल ते ऑगस्ट पर्यंत विणीचा हंगाम असतो. त्यावेळी हे पक्षी आपल्या जोड्या बनवतात.



**क्रिम्सन ब्रोड फिंच** (Crimson Browed Finch)

शुभ्रशा मंचकी, तांबडी चिमणी। शोभून दिसली, सुंदरशी।

हा पक्षी आम्ही तुंगनाथ मंदिराच्या परिसरात पाहिला. (१२००० फूट). ह्याची  चोच मजबूत व छोटी असते. ट्रीलाईनच्या वरती खुरट्या झुडुपांमध्ये हे पक्षी ब्रीडिंग करतात व हिवाळ्यात तशाच प्रकारच्या अधिवासात हे खाली येतात.



पिंक ब्रोड रोजफिंच (Pink Browed Rosefinch)

गुलाबी रंगाचा, पक्षी इवलासा। पुनःश्च दिसावा, येता जाता।

फिंचेस - शंकूच्या आकाराची मजबूत चोच, जी बिया फोडण्यासाठी योग्य, रंगीत पिसारा. सहसा विस्तीर्ण अधिवासात रहाणाऱ्या त्यामुळे स्थलांतर करत नाहीत. काही देशामध्ये यांचा वापर कोळसा खाणीत करण्यात येत असे. खाणीतील कार्बन मोनो ऑक्साईड ओळखण्यासाठी यांचा उपयोग होत असे.



गोल्डन बुश रॉबिन - मेल (Golden Bush Robin - Male)

तुझ्या पायाखाली, पान पान कळी। वेगळी नव्हाळी, दिसे छान।

हा सोनेरी पिवळ्या रंगाचा रॉबिन. नराला सोनेरी पिवळ्या भुवया, पिवळी पोटाकडील बाजू व काळा चेहरा असतो. हा पक्षी आम्हाला तुंगनाथ वरून खाली उतरताना (११००० फुटावर) दिसला.



काष्ठशिल्प (Wood Art)

काष्ठशिल्पामागे, हिमशिल्प उभे। नीलाकाशी शोभे, निरंतर।

बर्फाच्छादित शिखरे म्हणजे फोटोग्राफी साठी पर्वणीच. चोप्त्याच्या रस्त्यावर बऱ्याच ठिकाणी हिमशिखरे दिसतात. त्यापैकी एका ठिकाणी एका वाळक्या झाडाजवळून जाताना हा योग आला. अशा रस्त्यावर खरे तर पायी फिरले तर झाडे,पाने, फुले, पाण्याचे छोटे प्रवाह ह्यामधील फोटोजेनिक जागा शोधता येतील.



पिका (Pika)

काच गोटी जणू , डोळा हा शोभतो। सुंदर दिसतो, 'पिका' स या।



हिमालयात आढळणारा हा उंदरासारखा प्राणी. अंगावर फर, गोल कान. शेपूट नसलेला हा प्राणी उतारावरील दगडांच्या फटीत आढळतो. वनस्पती, गवत, फुले इ. हाच याचा आहार. शीतनिद्रा घेत नसल्यामुळे आपल्या बिळामध्ये आहार साठवून हिवाळ्याची बेगमी करण्याची याची सवय.



वेज टेल्ड ग्रीन पिजन - मेल (Wedge Tailed Green Pigeon - Male)

पक्षी हा देखणा, दिसे ऐटबाज। निसर्गास साज, चढविला।



साधारणतः ८००० फुटापर्यंत आढळतात. विविध प्रकारची फळे पिकण्याच्या वेळेनुसार निरनिराळ्या ठिकाणी व वेगवेगळ्या ऋतूत आपले स्थान बदलतात. डोके सारखे वर खाली करण्याची ह्यांची सवय असते. पिजन फॅमिलीतील पक्षी हे द्रव शोषून घेतात. बाकीचे पक्षी घोट घेतात व गिळतात.



फायर ब्रेस्टेड फ्लॉवरपेकर (Fire Breasted Flowerpecker)

नजर नेमकी, टिपते भक्षास। ज्ञान ते पक्ष्यास, जन्मजात।

हा पक्षी (loranthus) नावाच्या एका परजीवी झाडाची फळे खातो. फळांचा गर खाल्ल्यावर टाकून दिलेले बी बऱ्याच वेळा मुख्य झाडाच्या खोडाला चिकटते व तेथे पुन्हा नवीन परजीवी झाड तयार होते. काही वेळा गिळलेले बी नवीन झाडाच्या खोडावर टाकले जाते व तेथे परजीवी झाड तयार होते. फुलातील रस, छोटे कीटक व कोळी सुद्धा यांचे भक्ष असते.



रेड बिल्ड ब्लू मॅगपाय (Red Billed Blue Magpie)

निष्पर्णाची शोभा, पाचू रंगावर। पक्षीही त्यावर, शोभणारा।



कावळ्याच्या फॅमिलीतील हा पक्षी. जंगलाप्रमाणे हा पक्षी शहरातील वस्तीजवळही दिसतो. आम्हाला हा भूतान मध्ये थिंपू शहराजवळ दिसला. झाडावर आणि जमिनीवर हा पक्षी आपले अन्न शोधतो. हिमालयातील बऱ्याचशा जंगल रिसॉर्ट्स च्या जवळपास खरकटे खायला याचा वावर असतो. छोटी फळे, बिया,सरपटणारे छोटे प्राणी हा याचा आहार. दुसऱ्या पक्ष्यांच्या आवाजाची नक्कल हा पक्षी करतो.



रुफस बेलिड वूडपेकर - फिमेल (Rufous - Bellied Woodpecker - Female)

हातोडीचे काम, करणारी चोच। सुतार पक्ष्यास, देई कोण?

शक्यतो एकटे किंवा जोडीने दिसतात. झाडाच्या खोडातील किडे त्यांची अंडी, अळ्या खातात. ह्या शिवाय फुलातील रस तसेच काही प्रकारची फळे ही खातात. झाडाच्या खोडात चोचीने हातोडी सारखे घाव घालून खोडात घरटे बनवून त्यात अंडी घालतात. ह्यांनी सोडून दिलेली घरटी झाडावर राहणारे इतर पक्षी वापरतात.



ग्रेटर येलोनेप (Greater Yellownape)

करी निरीक्षण, इवल्या डोळ्यांनी। झाडास पायांनी, पकडले।

ठळकपणे आढळणारा मानेवरील पिवळ्या रंगाचा क्रेस्ट हे याचे वैशिष्ठ. सुमारे ७००० फूट उंचीपर्यंत आढळतो. जमिनीपासून २० फुटापर्यंत झाडाच्या खोडात घरटे बनवतो. झाडांच्या खोडावर किंवा फांद्यावर हे आपल्या चोचीने टक टक आवाज करत त्यातील किडे शोधतात.



कलीज फेझन्ट - मेल (Kalij Pheasant - Male)

बदामी तांबडा, डोळ्याचा आकार। नवीन प्रकार, आवडला।

छोटे गट किंवा जोडीने फिरताना दिसतात. जंगलाच्या टोकाला रस्त्यावर अन्नाचा शोध घेत फिरतात. धान्य, मुळे, जमिनीतील कंद किडे व छोटे सरपटणारे प्राणी हे यांचे खाद्य. आमच्या पक्षी निरीक्षणाच्या बहुतेक रोजच्या सकाळच्या फेरीत ४/५ एकत्र रस्त्यावर हमखास वावरताना दिसत.



उखीमठ मंदिर (Ukhimath Temple)

केदारनाथ आणि, मधमेश्वर देव। वास्तव्य करिती आशिर्वाद देत।

उखीमठ रुद्रप्रयाग जिल्ह्यातील हिंदूंचे एक पवित्र स्थान. हे ओंकारेश्वराचे मंदिर.

हिवाळ्यामध्ये केदारनाथ व मध्यमाहेश्वर यांच्या मूर्तींची पूजा उखीमठ येथे केली जाते.

उखीमठ येथे विविध देवतांची अनेक प्राचीन देवळे आहेत.

केदारनाथ येथे जाणे शक्य नसेल तर केदारनाथांचे दर्शन हिवाळ्यात उखीमठ येथे घेता येते.



उखीमठ मंदिर (Ukhimath Temple)

उखीमठ जेथे, तिथे देव येती। स्वरूप दाविती, भक्तगणा।

हिंदू पुराणाप्रमाणे उषा (बाणासुराची मुलगी) व अनिरुद्ध (श्रीकृष्णाचा नातू) यांचा विवाह ह्या ठिकाणी झाला. त्यामुळे ह्या जागेला उषामठ किंवा सध्या उखीमठ असे म्हणतात. केदारनाथ मंदिराचे मुख्य पुजारी ह्या ठिकाणी राहतात.



लिट्ल फोर्कटेल (Little Forktail)

दगड धोंडयात, खरा खरा पक्षी। कोरलेली नक्षी, वाटे मज।

फोर्कटेल हा पक्षी लहानमोठे धबधबे, झरे, पाण्याचे प्रवाह ह्या ठिकाणी  वावरताना दिसतो. अळ्या, किडे शोधत हे पक्षी पाण्याच्या आणि बाजूच्या रस्त्यावर सुद्धा फिरतात. पाण्याच्या प्रवाहाच्या काठावरील खबदाडीतच हे घरटी बनवतात.



स्पॉटेड फोर्कटेल (Spotted Forktail)

नक्षीकाम किती, याच्या अंगावर। कोण चित्रकार, आहे याचा।

अत्यन्त रुबाबदार, ठिपकेदार असा काळा पांढरा पक्षी, डोंगरातील धबधब्यांच्या जवळ हे पक्षी दगडांवरून एकटे किंवा जोडीने उडया मारताना दिसतात. लांब शेपटी जमिनीला समांतर उचललेली असते. पाण्यातील कीटक व त्यांच्या अळ्या खातात.



ब्राऊन डीपर (Brown Dipper)

नभ उजळले, उन्हे खाली आली। उन्हासाठी पक्षी, काठावर।

हा पक्षी पाण्याच्या जवळपास दिसतो. उथळ पाण्याच्या तळाशी असलेले प्राणी व वनस्पती हे ह्याचे खाद्य. सहसा एकटा पक्षी पाण्याच्या प्रवाहातील दगडांवर किंवा वाळलेल्या खोडावर बसलेला दिसतो. पाण्यात बुडी मारून आपले भक्ष मिळवतो.



स्पॉट विंग्ड स्टार्लिंग (Spot - Winged Starling)

दिवसाला झाली, सुरवात त्याच्या। ओढीने उन्हाच्या, शेंड्यावर।

झाडावर वावरणारा, छोट्या थव्यामध्ये गोंगाट करणारा व फळे खाणारा,तसेच कीटक व फळातील रस खाणारा हा पक्षी. एखाद्या फुलांनी भरलेल्या झाडावर हा पक्षी इतर पक्ष्याना हुसकावून लावतो. फुलांच्या झाडावरून एखादा छोटा थवा क्षणात उडून आकाशात गिरकी मारून परत तेथे येऊन बसतो.



ग्रे ट्रिपाय (Grey Treepie)

निसर्गाच्या रंगी, साधुनिया संग। सावळा श्रीरंग, पुढे उभा।

साधारणतः ८००० फुटापर्यंत आढळतात. उंच झाडांवर असतात, जमिनीवर येऊन शेतातील बियाणेही खातात, तसेच अनेक प्रकारचे किडे, छोटे सरपटणारे प्राणी, धान्य, बिया, फुलातील रस हि खातात. घरटे बांधणे व पिलांचे संगोपन यात नर व मादी ह्या दोघांचाही सहभाग असतो.



व्हाईट ब्रोड फँटेल (White - browed Fantail)

इवलासा जीव, आकाश डोळ्यात। ताकद पंखात, आहे याच्या।

याचा वावर शहरात सर्वत्र आढळतो. उडणारे कीटक, माशा, छोटे कोळी,पंखांची वाळवी आणि मुंग्या हे त्यांचे मुख्य अन्न. सहसा घरटे झाडाच्या फांदीच्या बेचक्यात, कपाच्या आकाराचे असते ते काटक्या, गवत व कोळ्याची जाळी यापासून बनविले जाते.



हा पक्षी सतत हालचाल करत असतो  त्यामुळे फोटो काढणे कठीण. शक्यतो एकटा किंवा जोडीने दिसतो. आपला पिसारा पंख्यासारखा फुलवून व अत्यन्त चपळाईने इकडून तिकडे मान हलवून याची हालचाल चालू असते. पाण्याजवळील डासांसारखे छोटे कीटक हवेत सूर मारून पकडतो.

येलो बेलिड फँटेल (Yellow Bellied Fantail)

क्षणाचा विसावा, काटाही दिसेना। भय काट्याचे, ना आहे याला।



**ऑरेंज ओकलीफ बटरफ्लाय** (Orange Oakleaf Butterfly)

पंख पसरता, शोभा दिसतसे। वाटे धरावेसे, कोणालाही।

देवभूमीचे पक्षी वैभव

ह्या फुलपाखराच्या प्रजाती मध्ये फिमेल ह्या मेल पेक्षा मोठ्या असतात. ड्राय सिझन व वेट सिझन अनुसार यांचा आकार व रंग ह्यात फरक दिसतो. वेट सिझन फॉर्म मध्ये रंग गडद असतात.



ऑरेंज ओकलीफ बटरफ्लाय, पंख मिटलेल्या अवस्थेत

(Orange Oakleaf Butterfly, Closed Wings)

पंख मिटलेले, कळेना कोणाला। वाळक्या पानाला, कोण धरी?

पंख मिटलेल्या अवस्थेत हे हुबेहुब वाळलेल्या पानासारखे दिसते. आवरणाखाली लपण्याच्या ह्या (camouflage) पद्धतीमुळे फुलपाखरांचे संरक्षण होते. बाहेरील रेषा पानांच्या शिरांसारख्या दिसतात. कीटक भक्षी पक्ष्यांच्या नजरेत सहजा सहजी येत नाहीत.

## देवभूमी - मक्कुमठ

कसे कुठे जावे, केली शोधाशोध
जेथे तुंगनाथ, देव आहे

मार्कन्डेय ऋषी, तपोभूमी त्यांची
महती क्षेत्राची, सर्वदूर

देवभूमीच्या या, मक्कुमठ क्षेत्री
पक्षीमित्र यात्री, येती जाती

मक्कुमठ क्षेत्री, येण्याचा आनंद
बोलला मिलिंद, मला पण

पक्षीमित्र नेगी, तेथेच राहतो
सोयही पाहतो, राहण्याची

देवभूमीत या, वैभव पक्ष्यांचे
पाहता साऱ्यांचे, मन तृप्त

उन्हाळा संपून, पुढच्या थंडीला
परतुनी या ना, नेगी बोले

मिलिंद मानसी, सोबत आदिती
बरोबर आली, यात्रेसाठी

खूप उंचावर, तुंगनाथ देव
बर्फाचा वर्षाव, सुरु झाला

तापमान होते, शून्यावर गेले
थैमान थंडीचे, सोसवेना

साठवण पाणी, प्यावयाचे पाणी
नळाचेही पाणी, गोठलेले

अनुभव सारे, थंडीचे घेतले
मन सुखावले, पाहताना

हरपले मन, डोंगर दऱ्यांचे
सौन्दर्य बर्फाचे, टिपताना

अवधीत थोडया, पक्ष्यांचे वैभव
लुटून श्रीमंत, झालो आम्ही

पक्ष्यांचे वैभव, घेऊन कवेत
पोचलो पुण्यात, दावावया

- सौ. प्रतिभा दिलीप गोरे

**These are the photographs included in the book.**

01. Alpine Accentor
02. Gery Winged Blackbird (Male)
03. Gery Winged Blackbird (Female)
04. Chestnut Crowned Laughing Thrush
05. Streaked Laughing Thrush
06. Rufous Chinned Laughing Thrush
07. Scaly Thrush
08. Striated Laughing Thrush
09. Black Bulbul
10. Himalayan Bulbul
11. Rock Bunting
12. Maroon Oriole
13. Ultramarine Flycatcher
14. Green Tailed Sunbird
15. White Throated Laughing Thrush
16. Yellow Breasted Green Finch
17. Scarlet Finch (Male)
18. Gery Winged Blackbird (Female)
19. Blue Capped Rock Thrush
20. Koklass Pheasant
21. Eurasian Jay
22. Black Headed Jay
23. Black Faced Warbler
24. Coal Tit
25. Black Throated Tit
26. Great Barbet
27. White Browed Fulvetta
28. Himalayan Monal (Male)
29. Himalayan Monal (Female)
30. Crimson Browed Finch (Male)
31. Pink Browed Rosefinch (Male)
32. Golden Bush Robin (Male)
33. Wedge Tailed Pigeon (Male)
34. Fire Breasted Flowerpecker
35. Red Billed Blue magpie
36. Rufous Bellied Wood Pecker (Female)
37. Greater Yellownape
38. Kalij Pheasant (Male)
39. Little Forktail
40. Spotted Forktail
41. Brown Dipper
42. Spot Winged Starling
43. Grey Treepie
44. White Browed fantail
45. Yellow Bellied fantail

***Species seen other than the photographs in Makkumath area – (May18)***

01. Banded Flycatcher Shrike
02. Bar Tailed Treekreeper
03. Black & Yellow Grossbeak (Male & Female)
04. Black Frankolin
05. Chestnut bellied Rockthrush
06. Dark sided Flycatcher
07. Eurasian cuckoo

08. Verditer Flycatcher
09. Grey crested tit
10. Grey Headed Warbler
11. White capped Redstart
12. Long tailed minivet
13. Grey headed woodpecker (F)
14. Rufous cibia
15. Slaty headed Parakeet (M /F )
16. Small Niltava
17. Hoopoe
18. Blue Throated Barbet
19. Grey headed canary flycatcher
20. Specled speculet
21. Kalis Pheasant (Female)
22. Rufous gorgeted Flycatcher
23. Rusty Cheeked Scimitar Babbler
24. Golden Bush Robin (F)
25. Scarlet Finch (F)
26. Crimson Browed Finch (F)
27. Pink Browed Rosefinch (F)
28. Black Throated sunbird
29. Green Backed Tit
30. Dark Sided Flycatcher
31. Nepal wren Babbler
32. Tickell's Thrush (F)
33. Black Faced laughing Thrush
34. Olive backed pipit
35. Rusty Flanked Treekeeper

***Additional Species seen in the same area (Jan 19) :***

01. Himalayan Blue Tail (M/F)
02. Grey Shrike
03. Rufous Breasted accentor
04. Whiskered Yuhina
05. Winter Wren
06. Brown Fronted Woodpecker
07. Spot Winged Rosefinch
08. Snow Pigeon
09. Common Buzzard
10. Plumbeous Water Redstart (F)

**All these photographs were taken with:**

Canon SX60 HS (Point & Shoot Camera)

**Sparrow House:**

Yashpal Sing Negi (Mob.: + 91 9412909399)

■ ■ ■



हिमालयाच्या परिसरात फिरल्यावर तेथील निसर्ग, नद्या, पक्षी, देवळे व अत्यंत आपलेपणाने मदत करणारे लोक एक वेगळीच अनुभूती देतात. त्यामुळे पुन्हा पुन्हा हिमालयाच्या परिसरात फिरण्याचा मोह होतो.



Cover & Layout By :
Parag Gore
98900 40013